प्रकरण दाखल दिनांक – १३.१०.२०२२
प्रकरण नोंदणी दिनांक - १३.१०.२०२२
प्रकरण निकाल दिनांक - १६.०१.२०२४
कालावधी - **०२** वर्षे **०३** महिने **०३** दिवस

.....

**गोंदिया येथील न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, (कोर्ट नं. २) यांच्या न्यायालयात**
( पिठासीन अधिकारी – श्री. एम. बी. कुडते )

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. २९०३/२०२२** **निशाणी क्र. - ११**

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र शासन तर्फे<br>दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन<br>शुल्क गोंदिया शहर,<br>ता. जि. गोंदिया, | }<br>}<br>}<br>} | **अभियोग पक्ष....** |

**- विरुध्द -**

| | | |
|---|---|---|
| विजय गोपाल मेश्राम,<br>वय ३६ वर्षे, धंदा- मजुरी,<br>रा. गोविंदपूर, गोंदिया,<br>ता. जि. गोंदिया. | }<br>}<br>}<br>} | **आरोपी.........** |

....

**गुन्हाः-** मुंबई दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) अन्वये

.....................................................................

अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता - श्रीमती कृष्णा चौरेसीया
आरोपीतर्फे विधिज्ञ - श्री शामकुवर.

.....................................................................

## न्यायनिर्णय
(घोषीत दिनांक १६ जानेवारी, २०२४)

१. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द मुंबई दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) अन्वये दोषारोप ठेवला आहे.

## अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की-

२. दिनांक २०.०८.२०२२ रोजी ०७.४० ते ०८.४० वाजताचे सुमारास मौजे गोविंदपूर, गोंदिया, ता. जि. गोंदिया येथे आरोपीने त्याचे राहत्या घरी ३० लिटर हातभट्टी दारू विनापरवाना बेकायदेशीररित्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगल्याचे मिळून आले. त्यामुळे फिर्यादी श्री ए. एम. शेख, दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गोंदिया शहर यांनी पोलीस ठाणे, गोंदिया शहर यांनी फिर्याद दाखल केली आहे.

३. सदर फिर्यादीवरुन गुन्हा गु.र.क्र. ३०३/२०२२ प्रमाणे नोंदवला. सदर गुन्हयाच्या तपासात तपासी अंमलदार यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले. नमुना रासायनीक प्रथःकरणासाठी नागपूर येथे पाठवले. आरोपीच्या विरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे.

४. आरोपीविरुध्द निशाणी क्र. ६ अन्वये मुंबई दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) प्रमाणे दोषारोप निश्चित केला. सदर दोषारोप आरोपीने नाकारुन संपरीक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. आरोपीच्या विरुध्द पुरावा मिळून न आल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

५. अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ व आरोपीतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावर मी खालील दिलेल्या कारणामिमांसेवरुन पुढील प्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, दिनांक २०.०८.२०२२ रोजी ०७.४० ते ०८.४० | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | वाजताचे सुमारास मौजे गोविंदपूर, गोंदिया, ता. जि. गोंदिया येथे आरोपीने त्याचे राहत्या घरी ३० लिटर हातभट्टी विनापरवाना बेकायदेशीररित्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगल्याचे मिळून आले व त्यायोगे त्यांनी मुंबई प्रतिबंधक अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा केला आहे ? | |
| २ | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ करीता -

६. आरोपी हे बेकायदेशीरपणे आरोपीने त्याचे राहत्या घरी एका प्लॉस्टीक कॅनमध्ये ३० हातभट्टी दारू विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगताना मिळून आले होते असे निसंशयपणे सिध्द करण्याची जबाबदारी अभियोग पक्षावर आहे. अभियोग पक्षाने पंच साक्षीदार रवी भाउलाल दुधबर्वे यांना निशाणी क्रमांक ६ लगत व साक्षीदार क्र. २ दुर्गेश किशोर राउत यांना निशानी १० वर तपासले आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीत असे सांगितले आहे की, दिनांक २०.०८.२०२२ रोजी पोलीसांनी त्यांची एका कागदावर सही घेतली, परंतू त्यांचेसमक्ष आरोपीच्या ताब्यातून कोणतीही जप्ती केली नाही. घटनास्थळ पंचनाम्यावर त्यांची सही आहे. घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर माहित नाही असे सांगितले आहे. त्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतू त्याचा काही उपयोग झाला नाही. अभियोग पक्षाला संधी देवूनही अभियोग पक्षाने उर्वरीत साक्षीदारांना तपासले नाही. त्यामुळे अभियोग पक्ष घटनास्थळ/जप्ती पंचनामा निसंशयपणे सिध्द करु शकले नाही. अभियोगपक्ष जप्ती पंचनामा निसंशयपणे सिध्द करु शकला नाही. अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषणाचा अहवाल

दाखल केलेला नाही. त्यामूळे आरोपीच्या ताब्यातून  त्याचे राहत्या घरी एका प्लॉस्टीक कॅनमध्ये ३० लिटर हातभट्टी दारू जप्त केली होती असे अभियोग पक्ष सिध्द करु शकले नाही. वरील विवेचनावरुन मी या निष्कर्षाप्रत पोहोचलो आहे की, आरोपीने बेकायदेशीरपणे त्याचे राहत्या घरी एका प्लॉस्टीक कॅनमध्ये ३० लिटर हातभट्टी दारू विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगल्याचे मिळून आले असे अभियोग पक्ष निसंशयपणे, सबळ, पुरक व विश्वासार्ह पुराव्यानिशी सिध्द करु शकला नाही. परिणामी मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक २ करीता**

७. मुद्दा क्रमांक १ चे निष्कर्ष विचारात घेता आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे.  मुद्दा क्रमांक २ च्या उत्तराकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) आरोपीची मुंबई दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) च्या दोषारोपातून फौ.प्र.सं. कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीनकतबा रद्द करण्यात येतात.

३) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७ अ प्रमाणे रु. ७५००/-चा वैयक्तिक जातमुचलका द्यावा.

स्वा /-
(एम.बी.कुडते)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
(कोर्ट नं. २) गोंदिया.

ठिकाण - गोंदिया.
दिनांक १६.०१.२०२४

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | Mr. Chandesh A. Kawale, Stenographer (Grade 3) |
| Name of the Court | : | Mr. M.B.Kudte, 2nd Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C., Gondia. |
| Order signed by the Presiding Officer on | : | 16.01.2024 |
| Order uploaded on | : | 16.01.2024 |